# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

**फोन नं.(०२०) २६०५०६४१** **ई-मेल आयडी :-** sceapune@gmail.com

जा.क्र.रासनिप्रा/परिश्रामिक/भत्ते/ ७७५/२०१४
दिनांक : १८/११/२०१४

**वाचावे** :- १. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ७३ कब
२. महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ नियम ३,६, ७५ व ७७.

**आदेश**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब (१) नुसार राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण गठीत झाले असून सहकारी संस्थेच्या समितीच्या सदस्यांची सार्वत्रिक निवडणुका, नैमित्तीक रिक्त पदांसाठीची निवडणुक व पदधिका-यांच्या निवडणुका घेणेचे अधिकार प्राधिकरणास आहेत.

राज्यातील सर्व सहकारी संस्थांच्या निवडणुका पार पाडण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ मधील नियम ४ मध्ये सहकारी संस्थांचे अ,ब,क व ड असे प्रकार करण्यात आलेले आहेत. प्राधिकरणाने 'क' वर्गातील सहकारी संस्थेच्या निवडणुकासंदर्भात परिपत्रके, आदेश, मार्गदर्शनपर सुचना इत्यादी निर्गमित केलेले आहेत.

महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ मधील नियम ७५ मध्ये 'क' वर्गातील सहकारी संस्थांच्या निवडणुक प्रक्रियेबाबत तरतुद असून या नियमान्वये 'क' वर्गातील सहकारी संस्थांच्या निवडणुका घेणे अनिवार्य आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब (१३) व महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ मधील नियम ६ अन्वये निवडणुकी प्रयोजनार्थचा अंदाजीत खर्च व निवडणुकीसाठी नियुक्त व्यक्तींचे परिश्रमिक व भत्ते याबाबत तरतुद असून नियम ७७ अन्वये पदाधिकारी निवडणुकीची तरतुद आहे.

'क' प्रकारातील सहकारी संस्थांच्या निवडणुकांसाठी होणा-या खर्चासाठी निवडणुक निधी व परिश्रमिक/भत्ते देणे आवश्यक आहे. त्यासाठी निवडणुक निधी, परिश्रमिक व भत्ते किती असावेत हे निश्चित करणे गरजेचे आहे.

त्यास अनुसरुन राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणास प्राप्त महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब (१३), महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ चे नियम ३ (v), (vi), ६,७५ व ७७

आणि प्राधिकरणास याबाबत समर्थ करणा-या सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण 'क' वर्ग संस्था बाबत खालील प्रमाणे निवडणुक निधी, परिश्रमिक व भत्ते नमूद अटी व शर्तीस अनूसरुन अनुज्ञेय राहील. असे आदेशीत करीत आहे.

**I. 'क' वर्ग संस्था परिश्रमिक व भत्ते.**

| अ क्र | पदनाम | परिश्रामिक (दर रुपये) मतदान झालेस | परिश्रमिक (दर रुपये) बिनविरोध झालेस |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | तालुका/प्रभाग सहकारी निवडणुक अधिकारी | मुळ वेतनाचे १०%किंवा रु१,५००/- जे कमी असेल ते | कॉलम ३ च्या ५० % |
| २ | निवडणुक निर्णय अधिकारी | मुळ वेतनाचे २५ %किंवा रु रु.४,०००/- जे कमी असेल ते ते | |
| ३ | सहाय्य निवडणुक निर्णय अधिकारी | निरंक | निरंक |
| ४ | मतदान केंद्राध्यक्ष/मतमोजणी पर्यवेक्षक | रु.३५०/- प्रतीदिन | निरंक |
| ५ | मतदान अधिकारी / मतमोजणी सहाय्यक | रु.२५०/- प्रतीदिन | निरंक |
| ६ | चतुर्थश्रेणी कर्मचारी | रु.१५०/- प्रतीदिन | निरंक |
| ७ | भोजनाची पाकीटे किंवा सौम्य अल्पोपहार | रु.१५०/- प्रतीव्यक्ती प्रतीदिन | निरंक |
| ८ | निवडणुक नियंत्रण कक्ष कर्मचारी | रु.२००/- प्रती कर्मचारी एकदाच | निरंक |
| ९ | निवडणुक खर्च / आचार संहिता नियंत्रण कक्ष कर्मचारी | रु.२००/- प्रती कर्मचारी एकदाच | निरंक |

अटी व शर्ती

१. जिल्हा सहकारी निवडणुक अधिका-यास परिश्रामिक अनुज्ञेय नाही.

२. तोटयातील प्राथमिक वि.का.सहकारी संस्था/ आदीवासी वि.का.सह.संस्थासाठी तालुका / प्रभाग सहकारी निवडणुक अधिका-यास परिश्रामिक अनुज्ञेय नाही.

३. तोटयातील प्राथमिक वि.का.सहकारी संस्था / आदीसासी वि.का.सहकारी संस्थासाठी निवडणुक निर्णय अधिका-याचे मानधन / परिश्रामिक मतदान झालेस मुळ वेतनाच्या १० % अथवा रु.१५००/- पैकी जे कमी असेल ते अनुज्ञेय राहील. बिन विरोध झाल्यास ५ % अथवा रु.१०००/- यापैकी जे कमी असेल ते अनुज्ञेय राहील.

४. निवडणुक नियम ४ मधील 'क' वर्गात नमुद अ.क्र.४ (मधील प्रा.दुग्ध संस्था वगळुन इतर संस्था) ५,६,७,८,९,१०,११,१२ व १३ वरील संस्थांबाबत तालुका / प्रभाग सहकारी निवडणुक अधिका-यास एकत्रित परिश्रामिक रु.१०००/- प्रती संस्था मतदान झालेस व रु.५००/- परिश्रामिक निवडणुक बिनविरोध झाल्यास अनुज्ञेय राहील.

## II. 'क' वर्ग संस्था अंदाजीत निवडणुक निधी रुपये

| अ क्र | संस्था प्रकार | निवडणुक निधी (रुपये) |
|---|---|---|
| १ | प्रा.वि.का.सो. | प्रती सभासद रु.१००/- किमान रु.१५,०००/- कमाल रु.३५,०००/- |
| २ | नागरी पत | प्रती सभासद रु.२००/-किमान रु.४०,०००/- कमाल रु.१ लाख |
| ३ | सेवक पत | प्रती सभासद रु.२००/-किमान रु.४०,०००/- कमाल रु.१ लाख |
| ४ | प्राथमिक ग्राहक भांडार | प्रती सभासद रु.१००/- किमान रु.१५,०००/- कमाल रु.३५,०००/- |
| ५ | प्राथमिक दुग्ध संस्था | प्रति सभासद रु.१००/- } किमान रु.१५,०००/- कमाल रु.४०,०००/- |
| | प्राथमिक मत्स्य/कुक्कुट/वराह/पशुसंवर्धन इ. | प्रती सभासद रु.१००/-, किमान रु.१०,०००/- कमाल रु.२०,००० हजार |
| ६ | शासकीय अर्थसहाय्य नसलेल्या औद्योगीक संस्था/ औद्योगीक वसाहती/ प्रक्रीया संस्था | प्रती सभासद रु.१००/-, किमान रु.१०,०००/- कमाल रु.२०००० हजार |
| ७ | प्राथमिक पणन संस्था | प्रती सभासद रु.१००/-, किमान रु.१०,०००/- कमाल रु.१५,००० हजार |
| ८ | प्राथमिक हातमाग/यंत्रमाग संस्था इतर कृषी संस्था व अ,ब,ड वर्गात समाविष्ट असलेल्या संस्था वगळुन | प्रती सभासद रु.१००/-, किमान रु.१०,०००/- कमाल रु.१०,००० हजार |
| ९ | गृहनिर्माण सहकारी संस्था | प्रती सभासद रु.१००/-, किमान रु.१२,०००/- कमाल रु.२०,०००हजार |
| १० | पाणीवापर / उपसा जलसिंचन | प्रती सभासद रु.१००/-, किमान रु.१०,०००/- कमाल रु.१५,००० हजार |

अटी व शर्ती

१. संबंधीत संस्थेने निवडणुक निधीची रक्कमेची मागणी संबंधीत निबंधकाकडुन प्राप्त होताच जिल्हा सहकारी निवडणुक अधिका-याचे स्टेट बँक ऑफ इंडिया अथवा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील खात्यात A/c Payee रेखांकीत धनादेश / डिमांड ड्राफट वा रोखीने भरणा करावी.

२. तालुका / प्रभाग सहकारी निवडणुक अधिका-याने प्राधिकरणाने विहीत केलेल्या नोंदवहीत जमा खर्चाच्या नोंदी कराव्यात.

३. तालुका / प्रभाग सहकारी निवडणुक अधिका-याने अंदाजीत निवडणुक खर्च व अंतीम निवडणुक खर्चाचे विवरण पत्र प्राधिकरणाने विहीत केलेल्या विवरण पत्रात तपशिलवार देयकांचे प्रतीसह अभिलेखात जतन करुन ठेवावे.

४. तालुका / प्रभाग सहकारी निवडणुक अधिकारी निवडणुक निधीची रक्कम शिल्लक राहील्यास संस्थेस रेखांकीत A/c Payee चेकने निवडणुक निकालाचे दिनांकापासून दोन महिन्याचे आत परत करेल.

५. अपवादात्मक परिस्थितीत उपरोक्त आदेशीत निधीपेक्षा जास्त निवडणुक निधी लागणार असल्यास निवडणुक निर्णय अधिका-याने खर्चाचे समर्थनीय कारणासह तपशिलवार प्रस्ताव तालुका / जिल्हा सहकारी निवडणुक अधिका-यामार्फत प्राधिकरणास सादर करावा. प्राधिकरणाचे मंजुरीनंतरच जादा निवडणुक निधी संस्थेकडुन निबंधकाने मागणी करुन वसुल करावा.

६. निवडणुक निधीमधुनच सर्व परिश्रामिक व भत्ते पदाधिकारी निवडणुकीचा परिश्रामिक खर्च करावयाचा आहे. त्यासाठी संस्थेकडुन स्वतंत्र रक्कमेची मागणी करु नये.

७. प्राधिकरणाने विहीत केलेल्या निवडणुक खर्चाचे विवरण पत्रातील नमुद बाबीवरील सर्व खर्च संस्थेने जमा केलेल्या निवडणुक निधीमधुनच करावयाचा आहे. विवरण पत्रात नमुद बाबींवरील कोणताही खर्च निवडणुक निधी व्यतीरिक्त संस्थेकडुन परस्पर करुन घेवू नये.

जिल्हा / तालुका / प्रभाग सहकारी निवडणुक अधिकारी/ निवडणुक निर्णय अधिकारी हयांनी निवडणुकांवरील खर्च शक्य तेवढा कमीत कमी ठेवण्याचा प्रयत्न करण्यात यावा व काटकसरीचे धोरण ठेवावे.

संस्थेच्या समितीसाठीची निवडणुक झाल्यानंतर संस्थेच्या पदाधिका-याची निवडणुक घेणेसंबंधात महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ मधील नियम ७७ मध्ये तरतुद करण्यात आली आहे. सदर तरतदीनुसार 'क' वर्गातील संस्थेच्या समितीच्या सदस्यांच्या निवडणुकीचा निकाल जाहिर झाल्यानंतर १५ दिवसांच्या आत त्या प्रयोजनार्थ घेण्यात येणा-या सभेसाठी संबंधीत निवडणूक निर्णय अधिका-यास राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण प्राधिकृत करीत आहे. या अधिका-याच्या (अध्यासी अधिकारी) अध्यक्षतेखाली पदाधिकारी निवडणुकीची सभा होईल. सदर पदाधिकारी निवडीच्या सभेसाठी प्राधिकृत अधिकारी (अध्यासी अधिकारी) बदलावयाचा असल्यास **प्राधिकारणाची पूर्व मंजूरी घेणे आवश्यक राहील.** त्यानुसार अशा पदाधिकारी निवडीच्या सभेच्या प्राधिकृत अधिका-यास / अध्यासी अधिका-यास परिश्रामिक देणे अनिवार्य असून ते खालील प्रमाणे अनुज्ञेय राहील.

| अ. क्र. | तपशिल | दर (रुपये) |
|---|---|---|
| १ | अध्यासी अधिकारी परिश्रामिक | रु.५००/- प्रती संस्था |

उपरोक्त आदेशाची काटेकोर पणे अंमलबजावणी करणेत यावी.

**मा.आयुक्त राज्य सहकारी निवडणुक प्राधिरण यांचे आदेशानुसार**

(डॉ.आनंद जोगदंड) 17/11/14
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रति,

१. जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी (सर्व)
२. तालुका सहकारी निवडणुक अधिकारी (सर्व)

प्रत माहितीसाठी सस्नेह,

१. मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य,पुणे.
२. मा.साखर आयुक्त,महाराष्ट्र राज्य,पुणे.
३. मा.संचालक,हातमाग यंत्रमाग व वस्त्रोद्योग,महाराष्ट्र राज्य,नागपूर.
४. मा.आयुक्त, दुग्ध व्यवसाय विकास,महाराष्ट्र राज्य,मुबंई.
५. मा.पणन संचालक,महारष्ट्र राज्य,पुणे.